# बी.ए. भाग ०३ (मराठी आवश्यक)

## कविता

## शेतकरी

## कवी बबन सराडकर

==================================

## मांडणी

डॉ. ममता इंगोले
प्रमुख, मराठी विभाग
डॉ. एच.एन. सिन्हा महाविद्यालय, पातूर

# बी.ए. भाग ०3 (मराठी आवश्यक)

कवी परिचय : बबन सराडकर (जन्म : १९५३)

व्यवसायाने शेतकरी व पत्रकारितेची आवड.

'विदर्भ जनजागर' या साप्ताहिकाचे संपादक .

आकाशवाणी व दूरदर्शनचे मान्यताप्राप्त कवी / सुगम गायक.

चंद्रबन', 'समुद्रपक्षी', 'कृष्णविवर', 'तू माझा सांगाती',

'हंबर' व 'पापणपालखी' हे सहा कवितासंग्रह प्रकाशित.

चंद्रबन या पहिल्या काव्यसंग्रहाला महाराष्ट्र शासनाचा केशवसुत पुरस्कार प्राप्त

# बी.ए. भाग ०3 (मराठी आवश्यक)

‘शेतकरी’ या कवितेत...

बळीराजा म्हणून

वाट्याला येणाऱ्या

हालअपेष्टा

चित्रित झाल्या आहेत.

# बी.ए. भाग ०३ (मराठी आवश्यक)

कुणासाठी जळताना स्वत: व्हायचे अंधार
आंधळ्याला वाट द्यावी असा दिव्याचा संसार...

कुणासाठी दळताना जन्म भरडत जावा
गळणाऱ्या दाण्यासंगे जीव पीठ पीठ व्हावा...

# बी.ए. भाग ०३ (मराठी आवश्यक)

असे दिव्याचे-जात्याचे ज्याने भोगायचे जिणे
त्याच्या अंगाखांद्यावर चिंध्याचिंध्यांची प्राक्तने....

स्वप्न पेरता पेरता मातीसंगे माती व्हावे
लोचनांच्या पखालींनी पीक ताऱ्यांचे काढावे...

# बी.ए. भाग ०३ (मराठी आवश्यक)

असे झुंजूमुंजू व्हावे आणि बदलावी कूस
तेव्हा गिधाडांची चोच चोच खुडते आकाश...

देह झिजतो मातीत पीक बुडते पाण्यात
पिचलेल्या आयुष्याचा भाव करतो पेठीत.

# बी.ए. भाग ०३ (मराठी आवश्यक)

**सुगी येते सुगी जाते हीच युगांची लढाई**
**ज्याचे काळीज फुलांचे त्यास कापती कसाई...**

*********

## धन्यवाद !

## ‘जय जवान। जय किसान।।’